# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक संकीर्ण २००७/(३२२/०७)विशी-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ.

**डॉ. श्रीराम श्रा. कावळे**
एम.ए. (अर्थशास्त्र), पीएच.डी., एम.कॉम., डी.बी.एम., जी.डी.सी.अँड ए.
प्र-कुलगुरु

**Dr. Shriram S. Kawale**
M.A.(Eco.),Ph.D.,M.Com., D.B.M., G.D.C.& A.
Pro-Vice-Chancellor


क्रमांक/गों.वि./१८४/२०२४

दिनांक :१६/०१/२०२४

## परिपत्रक

**विषय: - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० (NEP-2020) च्या अंमलबजावणीसाठी शैक्षणिक प्रशासन व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या नेतृत्व विकासातील क्षमता वाढीसाठी आयोजित कार्यक्रमामध्ये प्राचार्यांनी सहभाग नोंदविण्याबाबत.**

संदर्भ :- कार्यालयीन परिपत्रक क्र. गों.वि. १७९/२०२४ दिनांक १२/०१/२०२४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उच्च शिक्षण विभाग, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांनी पत्र क्रमांक १-४/२०२३-PN. II दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ अन्वये राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० च्या अंमलबजावणीसाठी शैक्षणिक प्रशासन व महाविद्यालयांच्या प्राचार्यांची नेतृत्व विकासातील क्षमता वाढविण्यासाठी नॅशनल इंस्टिटयुट ऑफ ऐज्युकेशनल प्लॅनिंग अँड अॅडमिनिस्ट्रेशन (NIEPA) या संस्थेला जबाबदारी देण्यात आली आहे. NIEPA या संस्थेद्वारे जानेवारी २०२४ मध्ये राज्यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या वतीने सदर प्रस्ताव स्विकारुन उपरोक्त कार्यशाळेचे दिनांक ३१ जानेवारी, १ व २ फेब्रुवारी, २०२४ रोजी आनंदवन, वरोरा जि. चंद्रपूर येथे आयोजन करण्याचे संदर्भिय परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. परंतु काही तांत्रिक कारणास्तव सदर कार्यशाळेचे आयोजन **दिनांक ३१ जानेवारी, १ व २ फेब्रुवारी, २०२४ ऐवजी दिनांक १२, १३ व १४ फेब्रुवारी, २०२४ रोजी आनंदवन, वरोरा जि. चंद्रपूर येथे** करण्यात येत आहे. उक्तप्रमाणे दिनांकात झालेल्या बदलाची नोंद घेवून आयोजित कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदवावा.

आयोजित कार्यशाळा ३ दिवसाकरीता (१२, १३ व १४ फेब्रुवारी, २०२४ रोजीपर्यंत) होणार असून आयोजित कार्यशाळेत ४० प्राचार्यांना (प्रथम नोंदणी प्रथम सहभाग या तत्वावर) सहभागी करण्यात येईल. आयोजित कार्यशाळेकरीता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी संलग्नित महाविद्यालयीन प्राचार्य सहभाग नोंदवू शकतील. सहभागी होण्यासाठी खालील लिंकवर दिनांक ३० जानेवारी, २०२४ रोजीपर्यंत नोंदणी करावी. **कार्यक्रमाकरीता नोंदणी झालेल्या प्राचार्यांना कार्यक्रमाचे वेळापत्रक त्यांच्या ईमेलवर कळविण्यात येईल.**

https://forms.office.com/r/h2MTDnD4pq

(डॉ. श्रीराम कावळे)
प्र-कुलगुरु

**प्रतिलिपी:-**

१) मा. कुलगुरुंचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. कुलसचिव कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.


M.I.D.C. Road, Complex Area, Gadchiroli - 442 605 (Maharashtra) Ph. No. 07132-222257 Cell: 9420143810,7588204968
Email : provc.gug@gmail.com, pvc@unigug.ac.in Web.: unigug.ac.in